॥ वंदेमातरम् ॥



शाहिरी डफ.

पोवाडा २५ वा.

# —: असावी नसावी: —

लेखक:— कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराव जामखेडकर

ऐक चातुरा । मनो मंदीरा । किर्ती देवता असावी । नैराश्याची । दास्यवृत्तीची अवकळ मूर्ती नसावी ॥ ध्रु० ॥ घरोघरींनी । ओट्यावरती । तुळशी माता असावी । कानाकोपऱ्याला तुझ्या घराला । घाण मुळीं ती नसावी ॥ १ ॥ पहाटेला पाणी । जात्यावर गाणी । सदाचरणी ती असावी । वेळीं अवेळीं दारोदारीं । फिरणारी नार नसावी ॥ २ ॥ ध्वजा पताका । रंग वल्लिका । द्वारा पुढती असावी । बोरीची काठी । हातीं नरोटी । कधीं कुणाच्या नसावी ॥ ३ ॥ गृहिणी मानी सुलक्षणी ती । घराघरांतून असावी । भांडण तंटा । अभिमान ताठा । धरणारी ती नसावी ॥ ४ ॥ कामाला दणगट । मजबुत मनगट । नारीला हिंमत असावी । दिखाऊ पुतळी । कुजकी सुतळी । कधीं कुठेहीं नसावी ॥ ५ ॥ डोळयांत पाणी । बिजली वाणी । तडफ तिच्यामधि असावी । चुकार तट्टू । बोलण्यात मिठ्ठू । भटक भवानी नसांवी ॥ ६ ॥ रण मर्दानी । झाशीं राणी । लक्ष्मीवाणी असावी । अंगान रोडकी । मनांत कुडकी । मित्री रोगी नसावी ॥ ७ ॥ घरांत शोभा । गावांत प्रभा । गुणाची गाभा असावी । तोंडाची फटकळ । सदा भांडकुदळ । चव्हाटी चुगली नसावी ॥ ८ ॥ कलाकुसरची । थोर हुशारी । बायकांमध्यें असावी । चटक चांदणी । नगर दुगाणी । चंगी

रंगी नसावी ॥ ९ ॥ चुलीवर गुंडा । कोंड्याचा मांडा । करणारी बायको असावी । मांड्याचा धोंडा । पतिच्या तोंडा । देणारी ती नसावी ॥ १० ॥ मनाची दिलदार । नेटका संसार । करणारी बायको असावी । नानापरी धन । घरांत सांठवण । दैना दावणारी नसावी ॥ ११ ॥ तलवारीला धार । मनाला आर । हातांत सत्ता असावी । उगीचं टुरटुर । रिकामी कुरकुर । दळभद्री नार नसावी ॥ १२ ॥ आडाला पाणी । अन्नाच्या खाणी । गजान्त लक्ष्मी असावी । वैऱ्या दारी पोटावारी । कधीं चाकरी नसावी ॥ १३ ॥ मोत्याला पाणी । जिवाला राणी । प्रेमाची खनी असावी । नखरा चाळा । नाटक शाळा । स्वैर वृत्तीची नसावी ॥ १४ ॥ फुलाचा हार । वळाचा भार । दुधाची धार असावी । चहाची बशी । जेवणांत माशी । गांवात इवशी नसावी ॥ १५ ॥ शूराला मान । काव्याची खाण । गाण्याला तान असावी । सुकुमार अंग । रंगांत दंग । तुळशींत भांग कधीं नसावी ॥ १६ ॥ वेदाची शाळा । तालमीचा चाळा । गुणाची बाळा असावी । फुलांत बिंदू । कजाग सासू । कधीं सूनेला नसावी ॥ १७ ॥ मर्दाला तलवार । गुणाचा वडीवार । शहाण्याची सभा असावी । गाढवाला मान । घरात सून । सासऱ्याची लाडकी नसावी ॥ १८ ॥ गाईला वैरण । अंगाला पैरण । मानाची पगडी असावी । गांवात वेकारी । रानांत गरी । जळकी भाकरी नसावी ॥ १९ ॥ प्रल्हादरायाची । नरहर कविची । स्नेह भावना असावी । गुलामगीरीची । तोडाया बेडी । भीती कुणाची नसावी ॥ २० ॥

संपूर्ण.

---

( कलादर्श प्रेस जळगांव )